Maharashtra State
Board of
Secondary & Higher
Secondary Education,
Kolhapur Divisional Board
Kolhapur - 416004

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - 416 004

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/4422
दिनांक:- 12 DEC 2025

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
सातारा / सांगली / कोल्हापूर.

विषय:- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) फेब्रुवारी - मार्च 2026 परीक्षेस प्रविष्ठ विद्यार्थ्यांचे APAAR ID नोंदवून घेणेबाबत..

संदर्भ:- क्र.रा.मं./गणकयंत्र/112/4320, दि.27.11.2025 चे पत्र

उपरोक्त सदंर्भीय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) फेब्रुवारी / मार्च- 2026 परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना निकालाचे वेळी Digilocker मध्ये विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत. त्याकरिता विद्यार्थ्यांच्या APAAR ID ची नोंद आवश्यक असुन APAAR ID द्वारे प्राप्त Digital गुणपत्रिकांचे विद्यार्थ्यांना होणारे लाभ पुढील प्रमाणे आहेत.

1. विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेचे कायमस्वरुपी Digital Record तयार होऊन सर्व शैक्षणिक गुणपत्रिका एकत्रित उपलब्ध होतात.
2. वेगवेगळ्या शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशप्रक्रिया सुलभ होते. शैक्षणिक संस्था / नियोक्ते त्वरीत पात्रता पडताळणी करु शकतात. भौतिक कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाहीशी होते.
3. सरकारी शिष्यवृत्ती व योजनांमध्ये लाभ मिळणे सुलभ होते.
4. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नोंदी कोठूनही उपलब्ध होतात.
5. केंद्रीकृत आणि सुरक्षित प्रणालीमुळे कागदपत्रे हरवण्याचा धोका नाही.

त्यामुळे आपल्या शाळेमधील सर्व विद्यार्थ्यांचे APAAR ID उपलब्ध करुन त्याची नोंद राज्य मंडळाचे संकेत स्थळ www.mahahsscboard.in वर करण्यात यावी.

Digitally signed by
Subhash Rajaram Chougule
Date: 12-12-2025 12:11:13

**(सुभाष रा. चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर**

प्रत सविनय माहितीस्तव सादर:

मा.सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे-004

ACK